# प्रेसनोट दिंनाक ११/०४/२०१९

प्रेरणा दत्तात्रेय मदने रा अमनोरा टाऊन पार्क हडपसर पुणे यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केले बाबत हडपसर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाले बाबत.

प्रेरणा दत्तात्रेय मदने यांचे पती सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रेय मदने हे भारती विदयापीठ पोलीस स्टेशन येथे नेमणुकीस असून त्याचे विरुध्द महिला नामे सोनाली सोनवणे यांनी दिंनाक २/२/२०१९ रोजी भारती विदयापीठ पोलीस स्टेशन येथे भा द वि कलम ३७६,४१७ अन्वये फिर्याद दिल्याने गुन्हा रजि क्रमाक १२९/२०१९ गुन्हा दाखल आहे.सदर गुन्हयाचा तपास सहापोलीस आयुक्त लष्कर विभाग पुणे हे करीत आहेत.सदर गुन्हयातील आरोपी दत्तात्रेय मदने हा गुन्हा दाखल झालेपासून फरार आहे.त्या दरम्यान सोनाली सोनवणे हिचा मा कोर्टात सीआरपीसी १६४ प्रमाणे जबाब नोंदविण्याचे कार्यवाही चालू असताना,आरोपी मदने यांनी त्यांचे विरुध्द दिलेली तक्रार मागे घ्यावी म्हणून फिर्यादी यांनी शिवीगाळ करुन धमकी दिलेबाबत त्यांनी हडपसर पोलीस स्टेशन येथे दिंनाक ४/२/२०१९ रोजी अदखलपात्र गुन्हा रजि क्रमांक १३३८/२०१९ भा द वि कलम ५०६,५०७ प्रमाणे तक्रार नोंद केलेली आहे.सदर गुन्हयाचा तपास चालू असताना,आरोपी मदने याची पत्नी प्रेरणा मदने यांनी हडपसर पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक राहुल भगवान वेताळ नेमणुक वाहातुक विभाग पुणे याने दिंनाक १०/२/२०१९ व दिंनाक १३/२/२०१९ रोजी अर्जदार याचे रहाते घरी ॲमनोरा टाऊन पार्क येथे येवून शाररीक अत्याचार केला असलेबाबतचा तक्रार अजे दिलेला आहे.सदर अर्जाची चौकशी चालू असताना राहुल वेताळ हे सोनाली सानेवणे यांचे भाऊ असल्याचे चौकशीदरम्यान निष्पन्न झाले आहे.त्यामुळे अर्ज चौकशीत त्यांचेकडे तसेच सोसायटी वॉचमने,तसेच प्रेरणा मदने यांनी अर्जात सांगीतले साक्षीदार विशाल सरोदे व इतर लोकांकडे चौकशी करता पोलीस कर्मचारी राहुल वेताळ हे अर्जदार यांचे घरी दिंनाक १०/२/२०१९ व दिंनाक १३/०२/२०१९ रोजी गेलेचे नसलेचे अर्ज चौकशी दरम्यान निष्पन्न झालेले आहे.साक्षीदार विशाल सरोदे यांनी चौकशीत सांगीतले की आरोपी मदने व त्याची पत्नी प्रेरणा मदने यांनी त्यांचेवर दबाव टाकून हडपसर पोलीस स्टेशन येथे असे सांगवे की प्रेरणा मदने यांचे घरी पोलीस राहुल वेताळ याने येवून अत्याचार केलेला आहे.पंरतू विशाल सरोदे यांनी आज रोजी आज रोजी त्यांनी वस्तुस्थिती सांगितली की, पोलीस कर्मचारी वेताळ यांनी कोणत्याही प्रकारे प्ररेणा मदने यांचेवर अत्याचार केलेला नाही. दोघांचे दबावास बळी पडून प्रथम खोटा जबाब दिलेला आहे. सदर अर्ज चौकशीत प्रेरणा मदने यांचे अर्जात तथ्य नसलेचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

परंतु गुन्हा दाखल करणेसाठी हडपसर पोलीस स्टेशनवर दबाव टाकणेसाठी आज दिंनाक ११/०४/२०१९ रोजी सकाळी ९/४५ वा सुमारास हडपसर पोलीस स्टेशन समोर प्रेरणा मदने यांनी येवून स्वताचे अगांवर सोबत आनलेल्या बाटलीमधील डिजेल अंगावर ओतून काडेपेटीचे साहयाने आग लावण्यात प्रयत्न करुन आत्महत्या करणेचा प्रयत्न केला असून त्या बाबत हडपसर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि क्रमांक ३३०/२०१९ भा. द. वि. कलम ३०९ प्रमाणे सहा पोलीस निरीक्षक खोपडे यांनी फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आलेला असून गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उप निरीक्षक तडवी हया करीत आहोत.